२०८७११२

परवानगी वर्ष : २००१- २००२ नुतनीकरण
माध्यम : मराठी
: विना अनुदान

जा.क्र. माध्य.३(१४)/प्रथम मान्यता/पुवि/२००२-३
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक : 26 AUG 2003

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद , पुणे.

विषय : प्रथम मान्यता. . .
न्यू. इंग्लिश स्कूल, आंबोली, ता. जुन्नर, जि. पुणे.

संदर्भ : १. आपले पत्र क्रमांक शिक्षण/माध्य/ह- ४/प्र.मा./०३/४८१,
दिनांक ११.७.२००३
२. शा.प.क्र. भमाशा- १००१/३४२/२००१/माशि-१, दिनांक २५.६.२००१
३. कार्यालयाचे पत्र क्रं. माध्य-३/१४/नमाशा/मान्यता/२००१/पुवि,
दिनांक २२.५.२००२

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यांत येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२ व ३.३ अन्वये **शिवांजली ग्रामविकास प्रतिष्ठान, घाळकवाडी, ता. जुन्नर, जि. पुणे** संस्थेच्या **न्यू इंग्लिश स्कूल, आंबोली, ता. जुन्नर, जि. पुणे.** माध्यमिक शाळेच्या **इयत्ता आठवी** च्या वर्गास **२००१-२००२** या शैक्षणिक वर्षासाठी **जून २००१** पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटोंची पूर्ततेस अधिन राहून देण्यांत येत आहे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी खालील अटोंची पूर्तता शाळा करित आहे किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटो पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यांत यावा. विना अनुदान

१. संस्थेने स्वतःच्या मालकीची शैक्षणिकदृष्ट्या योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन घ्यावी.
२. मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३. स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करुन घ्यावी.
४. स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथांची भर घालावी.
५. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घ्यावे.
६. पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन घ्यावा.
७. स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन घ्यावी.
८. वाढीव फी चे दर मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत.
९. शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०. कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणी नुसार वेतन अदा करावे.
११. शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२. विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३. तपासणी अहवालातील सुचनांची पूर्तता करावी.
१४. पालक शिक्षक संघाची स्थापना करावी.
१५. विद्यार्थ्यांसाठी संगणक सुविधा उपलब्ध करावी.
१६. विद्यार्थी संख्या वाढवावी.
१७. सोबतच्या त्रुटोंची पूर्तता करण्याच्या अटोवरच सदरची प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१ करिता

स्वाक्षरीवर शि. उ. सं. यांची
सही आहे.

प्रत :
१. मुख्याध्यापक, न्यू इंग्लिश स्कूल, आंबोली, ता. जुन्नर, जि. पुणे.
२. निवडनस्ती.

२०८११९७

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]
जा.क्र. शिक्षण/माध्य/ह-४/नै.वा./०२-०३
पुणे, दि. २५/११/२००२

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
न्यू इंग्लीश स्कूल, आंबोली
ता. खुनार

विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत. ०२-०३
इ.६ वी, इ. ७ वी, इ. ९ वी, इ. १० वी.

आपल्या शिवाजी ग्रामविकास प्रतिष्ठान वाडेबोल्हाई या शैक्षणिक संस्थेव्दारा संचलित न्यू इंग्लीश स्कूल, आंबोली माध्यमिक विद्यालयास इ. ८ वी ~~/इ. ५ वी~~ या वर्ग सुरु करणेस/सन २००१ - २००२ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र. माध्य/३[१४]/नमाशा/मान्यता/पुवि/२२६०२/८९ , दि२२/५/०२ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन २००२ - २००३ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ.६ वी, इ.७ वी~~, इ.९ वी, ~~इ.१० वी~~ या वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे. सदर वर्गास जून २००२ पासून नैसर्गिक वाढीने परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी संबंधित ~~उपशिक्षणाधिकारी, जि.प. पुणे~~ / गट शिक्षणाधिकारी, पं.स. खुनार यांचेशी संपर्क साधावा. तसेच शाळेची वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इ. १० वीचा वर्ग सुरु होत आहे अशा सर्व माध्यमिक शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ,पुणे १० यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. त्याबाबत आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची यादी सोबत देणेत येत आहे. त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी अन्यथा शाळेस संकेतांक न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार रहाणार नाही याची नोंद घेणेत यावी. [ मागील बाजूस कागदपत्रांची यादी आहे. ]

(स्वाक्षरी) २५/११/२००२
शिक्षणाधिकारी[माध्यमिक]
जिल्हा परिषद पुणे. करिता.

पुणे जिल्हा परिषद, पुणे.
"यशवंतराव चव्हाण भवन"
शिक्षण [माध्यमिक] विभाग.
जा.क्र.शिक्षण/माध्य/ह-८/
नै.वाढ/०३-२१
पुणे. दिनांक : २६/६/२००३

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
न्यू इंग्लिश स्कूल,
आळे - ता. जुन्नर.

विषय : नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत. २००३-०४
इ.८ वी, इ.९ वी, इ.९ वी, इ.१० वी.

आपल्या शिवांजली ग्रामविकास प्रतिष्ठान, चाळकवाडी या शैक्षणिक संस्थेद्वारा संचलित न्यू इंग्लिश स्कूल, आळे (जुन्नर) माध्यमिक विद्यालयास इ.८ वी/इ.५ वी.वी वर्ग सुरू करणेस सन २००१-०२ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र.माध्य/३[१४]/नमाशा/मान्यता/पुव/२२६०३/०१, दि. २२/५/२००२ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत इ.८ वी, इ.९ वी, इ.९ वी, इ.१० वी या वर्ग नैसर्गिक वाढीने सुरू होत आहे. सदर वर्गास जून २००३ पासून नैसर्गिक वाढीने परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करून घेणेसाठी संबंधित उपशिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, पुणे/गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती जुन्नर यांचेशी संपर्क साधावा. तसेच शाळेची वेळेत तपासणी करून घेवून तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इ.१० वी. चा वर्ग सुरू होत आहे, अशा सर्व माध्यमिक शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.

त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी अन्यथा शाळेस संकेतांक न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही, याची नोंद घेणेत यावी.

J.N.H.

शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद, पुणेकरिता.